7.19

महाराष्ट्र शासन
गृह शाखा,
नवीन प्रशासकीय इमारत,
जिल्हादंडाधिकारी कार्यालय, धुळे -४२४००१

दुरध्वनी क्र. ०२५६२-२८८७११/१२
Email ID : awalkhome.dhule@maharashtra.gov.in

क्र./ड/कक्ष-3/पोओएल/कावि/ 722/2022,
धुळे, दि.:- 27 /06/2022

प्रति,

म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.धुळे
म.पोलीस अधिक्षक,धुळे
म.आयुक्त, महानगरपालीका धुळे
म.सहाय्यक जिल्हाधिकारी उपविभाग धुळे
उपविभागीय अधिकारी शिरपूर भाग शिरपूर
अधिक्षक,राज्य उत्पादन शुल्क विभाग धुळे

अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क
धुळे यांचे कार्यालय
आवक क्र. 1818
दिनांक 1/07/22

**विषय** :-मालवणी मालाड पश्चिम येथे झालेल्या दारुकांडाच्या अनुषंगाने स्थापन करण्यांत आलेल्या समितीने सुचविलेल्या उपाययोजना बाबत...

**संदर्भ**:-म.सह सचिव, महसूल व वनविभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील ई-मेल संदेश क्र.संकीर्ण-2622/प्र.क्र.63/ज-3 दि.13/06/2022

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यांत येते की, मालवाणी मालाड पश्चिम येथील दुर्घटनेत झालेल्या 104 व्यक्तीच्या मृत्यूच्या अनुषंगाने स्थापन करण्यांत आलेल्या समितीच्या अहवालातील समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची मुद्देनिहाय माहिती गृह विभागाने दि.17/02/2022 रोजीच्या पत्रासोबत उपलब्ध करुन दिली आहे. सदर मुद्यांपैकी मुद्या क्रमांक 7.2.18 इतर विभाग / कार्यालयासह महसूल व वन विभागाशी व वन विभागाशी संबंधीत असल्याचे दर्शविण्यांत आले आहे. त्याअनुषंगाने आपणास असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, समितीच्या अहवालात समितीने सुचविलेल्या उपाययोजनेप्रमाणे आपल्या स्तरावरुन स्थानिक स्तरावरील महसूल व वन विभागाचे संबंधीत अधिकारी यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

तरी संदर्भिय पत्राची छायांकित प्रत यासोबत जोडून सादर केलेली आहे. संदर्भिय पत्रात नमूद केलेप्रमाणे आपल्यास्तरावरुन नियमानुसार कार्यवाही करण्यांत येऊन केलेल्या कार्यवाही बाबत या कार्यालयास अवगत करण्यांत यावे ही विनंती.

(संजय गायकवाड)
अपर जिल्हादंडाधिकारी,धुळे

प्रत:- मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर

03
1/7/22

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

मुख्य इमारत,१ ला मजला,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२८२१६५५ ई-मेल-j३.revenue@maharashtra.gov.in


**क्रमांक : संकीर्ण-२६२२/प्र.क्र.६३/ज-३** **दिनांक : १३ जून, २०२२.**

**प्रति,**

**सर्व विभागीय आयुक्त.**

**सर्व जिल्हाधिकारी.**

RDC 17/6

**विषय:- मालवणी मालाड पश्चिम येथे झालेल्या दारुकांडाच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या समितीने सुचविलेल्या उपाययोजना..**

**संदर्भ:-** शासन पत्र, गृह विभाग, क्र. एफएलआर-०७१५/ प्र.क्र. १५४ (भाग-१)/ राउशु-२, दिनांक १७.२.२०२२.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधीन पत्राची प्रत सोबत जोडली आहे. सदर पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

०२. मालवणी मालाड पश्चिम येथील दुर्घटनेत झालेल्या १०४ व्यक्तींच्या मृत्यूंच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अहवालातील समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची मुद्देनिहाय माहिती गृह विभागाने दिनांक १७.२.२०२२ रोजीच्या पत्रासोबत उपलब्ध करुन दिली आहे. सदर मुद्यापैकी मुद्दा क्रमांक ७.२.१८ इतर विभाग / कार्यालयांसह महसूल व वन विभागाशी संबंधित असल्याचे दर्शविण्यात आले आहे. सदर मुद्दा क्र. ७.२.१८ पुढीलप्रमाणे आहे:-

**सरकारी जमिनीवर चालणाऱ्या अवैध धंद्यांबाबत संबंधित स्थानिक स्तरावरील शासकीय अधिकारी / कर्मचारी, पोलीस पाटील, ग्रामसेवक इत्यादींवर अशा अवैध धंद्याची माहिती संबंधित पोलीस स्टेशनला कळविणे बंधनकारक आहे. अशा धंद्यावर नियमित कारवाईसाठी संबंधित आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधिक्षक, आयुक्त, यांचे स्तरावरुन स्थानिक स्तरावरील विभागाचे संबंधीत अधिकारी यांना कारवाई करणेबाबत दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात यावेत.**

०३. यानुषंगाने आपणांस असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, समितीच्या अहवालात समितीने सुचविलेल्या उपाययोजनेप्रमाणे आपल्या स्तरावरुन स्थानिक स्तरावरील महसूल व वन विभागाचे संबंधीत अधिकारी यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संबंधित विभागीय आयुक्त यांनी एकत्रित स्वरुपात शासनास (महसूल व वन विभाग तसेच गृह विभागास) तात्काळ सादर करावा, ही विनंती.

**आपला,**

**( रमेश चव्हाण )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत:-

(१) अवर सचिव (राऊशु-२), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

(२) निवड नस्ती (ज-३)

१७७१७८

९/५

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मंत्रालय (विस्तार), ५ वा मजला, दालन क्र.५५३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्र ०२२-२२०२७०७४ Email ID : home_exc2@maharashtra.gov.in

क्रमांक : एफएलआर-०७१५/प्र.क्र.१५४(भाग-१)/राउशु-२ दि. १७.०२.२०२२

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. आयुक्त, अन्न व औषध, प्रशासन, मुंबई
७. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई
८. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

विषय :- मालवणी मालाड पश्चिम येथे झालेल्या दारुकांडाच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या समितीने सुचविलेल्या उपाययोजना.

महोदय,

मालवणी मालाड पश्चिम येथील दुर्घटनेत झालेल्या १०४ व्यक्तींच्या मृत्यूंच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अहवालातील समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची मुद्देनिहाय माहिती सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. या अनुषंगाने मला आपणास कळविण्याचे आदेश आहेत की, सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने कार्यपुर्तता अहवाल शासनास सादर करणे आवश्यक असल्याने, सदर मुद्यापैकी आपल्या विभागाशी/कार्यालयाशी संबंधित मुद्याच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची मुद्देनिहाय माहिती सद्य:स्थितीसह या विभागास तात्काळ पाठवावी, ही विनंती.

सोबत :- वरीलप्रमाणे.

(सु.श.यादव)
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रत,

निवडनस्ती, राउशु-२.

मालवणी मालाड पश्चिम येथे झालेल्या दारुकांडाच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या समितीने सुचविलेल्या उपाययोजनांच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही

| मुद्दा क्र. | समितीने सुचविलेल्या उपाययोजनां | संबधित विभाग |
|---|---|---|
| ७.२.१ | मालवणी मालाड पश्चिम येथील घडलेली घटना ही मिथेनॉलमिश्रीत विषारी द्रव्याच्या सेवनाने झाली आहे. यापूर्वी राज्यातील व देशातील अशा स्वरुपाच्या मोठया दूर्घटना मिथेनॉलमिश्रीत विषारी द्रव्य/ गावठी दारुच्या सेवनामुळे झाल्याचे उघडकीस येते. मिथेनॉल या विषारी द्रव्याच्या संबंधीत विष द्राव्य कायदा, १९१९ व महाराष्ट्र विष अधिनिमय, १९७२ यामध्ये आवश्यक ते बदल करुन कठोर नियंत्रण व नियमनाच्या तरतूदी करणे आवश्यक आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाने जाहीर केलेली अधिसूचना दि. २१.१.११ च्या तरतूदींचे कठोरपणे पालन होईल. संबंधीत अधिसूनेस मा. उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती सदरहू वस्तुस्थिती मा. न्यायालयसाच्या निदर्शनास आणून मिथेनॉलचे नियंत्रण व नियमन किती आवश्यक आहे हे पुराव्यासह पटवून देवून स्थगिती आदेश उठविण्यासाठी वा सदर प्रकरणी मा. न्यायालयाच्या आदेशाचा विचार करुन मिथेनॉलच्या कठोर नियंत्रण व नियमनाबाबत दुरुस्त्या करण्याची दक्षता घेऊन आवश्यक ते सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक आहे. | १. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई<br>२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई |
| ७.२.२ | मिथेनॉलच्या निर्मितीपासून ते शेवटच्या वापरापर्यंत अन्न व औषध प्रशासनाचे नियंत्रण राहीत अशा प्रकारच्या तरतूदी विष द्रव्य कायदा, १९१९ व महाराष्ट्र विष अधिनियम, १९७२ मध्ये करण्याचा प्रस्ताव तयार करुन राज्य शासनाची व केंद्र शासनाची मंजूरीसाठी पाठपुरावा करावा. तसेच संबंधित नियम / अधिनियमाचे उल्लंघन करणाऱ्याविरुध्द कठोर कायद्याची तरतूदी करावे. त्यामुळे मिथेनॉलचा गैरवापर होण्यास प्रतिबंध होईल. | १. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई<br>२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई |

| | | |
|---|---|---|
| ७.२.३ | सदर घटनेतील आरोपींनी राज्यस्थान तसेच गुजरात येथील व्यापाऱ्यांच्या सहकार्याने मिथेनॉल मुंबई येथे आणून गावठी दारु म्हणून केलेली विक्री व त्यामुळे झालेले मृत्यू विचारात घेता आंतरराज्यीय तसेच, आंतरराष्ट्रीय वाहतूक व्यापारासंबंधातील कठोर तरतूदी करुन मिथेनॉलच्या तस्करीस आळा घालणे आवश्यक आहे. त्यासाठी अन्न व औषधे प्रशासन विभागाने आवश्यक तो प्रस्ताव केंद्र शासनास पाठवून कायद्यात बदल करावेत. | १. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई<br>२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई |
| ७.२.४ | मिथाईल व इथाईल अल्कोहोल यांच्या दरातील तफावत विचारात घेता बाजारात मिथेनॉलचे दर इथाईलच्या दराशी संलग्न करुन नंतर संबंधीत अधिकृत व्यापाऱ्याकडून त्याचा अंतीम वापर कशासाठी झाला याबाबत अधिकृत प्राधिकरणाचे प्रमाणपत्र घेवून मिथेनॉलच्या संबंधीत अधिकृत व्यापाऱ्यांना परतावा देण्यासाठी संबंधित कायद्यात व नियमात तरतूद करण्यात यावी. | १. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई<br>२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई |
| ७.२.५ | मिथेनॉल सहजपणे कुणालाही उपलब्ध होणार नाही यासाठी विष द्रव्य कायदा १९१९ व महाराष्ट्र विष कायदा १९७२ मध्ये आवश्यक त्या तरतूदी करण्यात याव्यात. | १. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई<br>२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई |
| ७.२.६ | गावदेवी मुंबई येथे छाया देशी बार येथील सन १९९१ मध्ये झालेल्या घटनेमध्ये नेमलेल्या समितीने अनेक उपाययोजना सूचविलेल्या आहेत. त्यापैकी बहुतांश उपाययोजनांची पूर्तता केलेली आहे. पार्थसारथी समितीच्या मिथेनॉल बाबत व इतर सूचविलेल्या उपाययोजनांची तात्काळ पूर्तता करण्यात यावी. | १. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई<br>२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई<br>३. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई<br>४. आयुक्त,राउशु<br>५. राज्य उत्पादन शुल्क विभाग ,<br>६. सामाजिक न्याय विभाग |

| | | |
|---|---|---|
| ७.२.७ | मिथेनॉल व इथाईल अल्कोहोल मधील फरक पाहताक्षणी सामान्य माणसास कळेल असा होण्यासाठी पार्थसारथी समितीने आपल्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे मिथेनॉलच्या निर्मितीनंतर तात्काळ विशिष्ट रंग व कडू पदार्थ टाकून ते बाजारात विक्रीची व वापराची तरतदू केल्यास मोठया प्रमाणावर प्रतिबंध घालता येईल. | १. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई<br>२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई |
| ७.२.८ | अवैध / गावठी दारु निर्मितीची राज्यातील सर्व केंद्रे कायमस्वरुपी बंद करण्यासाठी संबंधीत पोलीस व राज्य उत्पादनशुल्क विभागाने कठोर उपाययोजना करणे अवश्यक आहे त्यासाठी राउशु व पोलीस विभाग यांच्यादरमहा १ व १६ तारखेला गुन्हाच्या माहितीची देवाण-घेवाण करुन संबंधित माहितीच्या आधारे अवैध धंदयावर दोन्ही विभागाने कार्यवाही केल्यास अवैध धंदयावर अंकुश ठेवता येईल. पोलीस विभागाकडे उपलबध मनुष्यबळ व बीट लेव्हलला असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची उपलब्धता, त्यांना मुंबई दारुबंदी कायदा १९४९ व्यतिरिक्त इतर कायद्याची अंमलबाजवणीचे असलेले अधिकार, पोलीस विभागाची सक्षमता तसेच, शासनपत्र दि. २१.५.१९७४ तसेच. पोलीस महासंचालक महाराष्ट्र यांचे पत्र दि. १२.१.२००१ च्या अवैध धंद्यावर कार्यवाहीबाबत पोलीस विभागाची कर्तव्य विचारात घेवून संबंधित अवैध गावठी दारु निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक इ. केंद्रावर अंकुश ठेवण्ययासाठी विशेष उपाययोजना कराव्यात राज्य उत्पादन शुल्क व पोलीस विभाग यांनी संयुक्तरित्या विशेष मोहिमा राबवून संबंधित अवैध दारु निर्मिती केंद्रे कायमस्वरुपी बंद करण्यासाठी आवश्यक त्या कठोर उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच, पोलीस विभाग व राउशु अधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रातील ठिकाणाची तसेच अवैध धंदे वाढण्याची शक्यता असेल अशा जागेबाबतचे स्थळदर्शक नकाशे सर्व संबंधित पोलीस | १. राज्य उत्पादन शुल्क विभाग<br>२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.<br>३. आयुक्त,राउशु |

| | | |
|---|---|---|
| | स्टेशन व संबंधित उत्पादन शुल्क अधिकारी यांनी तयार करुन कार्यालयात दर्शनी भागात लावावे वेळोवेळी नकाशे अद्ययावत करुन कठोर कारवाई करण्याची दक्षता घेण्यात यावी. | |
| ७.२.९ | अवैध / गावठी दारुच्या धंदयात संघटीत गुन्हेगार असल्याने संघटीत गुन्हेगार /झोपडीदादा यांच्यावर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी संबंधितांवर नोंदविलेल्या गुन्ह्यात शिक्षा होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे, तडीपारीची प्रकरणे निकाली काढणे, संबंधितांकडून चांगल्या वागणूकीचा बाँड घेणे, एमपीएडी कायद्यांतर्गत् कारवाई करणे, संशयीतावर नियमितप्रमाणे निगराणी ठेवून गैरकृत्यांवर नियंत्रण ठेवणे इ. कार्यवाही पोलीस विभाग व राउशु विभागाने करावी. | १. राज्य उत्पादन शुल्क विभाग<br>२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.<br>३. आयुक्त,राउशु |
| ७.२.१० | अवैध / गावठी दारु धंदयाना स्थानिक नेत्यांचे मिळणारे पाठबळ असे धंदे करणाऱ्या व्यक्ती मोठे करण्यास व त्यातून अशा दूर्घटना घडण्यास कारणीभूत होवू शकतात ही बाब विचारात घेता, अशा अवैध धंदयावर कठोर कारवाई करतांना त्यात गुंतलेल्या कोणावरही दयामाया न दाखवता कारवाई करणे आवश्यक राहील. तसेच, अशा अवैध धंदयांत गुंतलेल्या स्थानिक नेत्यांवर इतर कठोर कायदेशीर तरतूद तसेच, निवडणूका संदर्भात अशा गुन्हयात आरोपी नसल्याबाबत अट करणे योग्य राहील. | १. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.<br>२. आयुक्त,राउशु |
| ७.२.११ | सदर घटना ज्या ठिकाणी घडली त्या जागेवर किरकोळ देशी दारु विक्रीची अनुज्ञप्ती स्थलांतरण करण्यास शासनाने मान्यता दिली होती. परंतु स्थानिक विरोधामुळे अनुज्ञप्ती सुरु होवू शकली नाही. परंतु, तेथे अशा प्रकारचे अवैध धंदे सुरु होते ही बाब विचारात घेता, देशी दारुच्या दुकानाच्या उपलब्धतेबाबत / स्थलांतरणाच्या अनुषगाने होणाऱ्या तक्रारीबाबत धोरण आखण्याची गरज आहे. त्याअनुषंगाने अनुज्ञपती स्थलांतरणाचा स्थानिकांचा | १. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क |

| | | |
|---|---|---|
| | विरोध असल्यास शासन अधिसूचना दि. २५.५.२००८ व दि. १२.८.२००९ मधील तरतुदीप्रमाणे अशा ठिकाणी देशी दारु स्थलांतरीत न होण्याबाबत ठराव असल्यास तो विचारात घेण्याची तरतूद करण्यावर शासनास प्रस्ताव सादर करावा व शासनाने त्यावर निर्णय घ्यावा. | |
| ७.२.१२ | राज्यात सन १९७३-७४ पासून नवीन किरकोळ विक्रीची अनुज्ञप्ती मंजूर न करण्याचे धोरण आहे. तथापि, सन १९७३-७४ नंतर लोकसंख्येची झालेली वाढ व गावाचे नागरीकरणात झालेले रुपांतर त्यामुळे ज्या भागात अनुज्ञप्ती नाही अशा भागात अवैध धंदे सुरु असल्याचे दिसून येते त्यामुळे अशा भागात अपघाताने दूर्घटना घडण्याची शक्यता आहे. यासाठी राज्यातील किरकोळी विक्रीची देशी दारुच्या अनुज्ञत्यांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात वाढविण्याचा निर्णय घेणे. | १. राज्य उत्पादन शुल्क विभाग, मंत्रालय मुंबई<br>२. आयुक्त, राउशु |
| ७.२.१३ | अवैध व गावठी दारु शासन मान्य देशी दारुपेक्षा अत्यंत स्वस्तात उपलब्ध होत असल्याने गरीब कामगार मजूरांचा स्वस्त दारु पिण्याकरिता ओढा असतो त्यामुळे अशा गरीब व्यक्तींच्या अवाक्यात देशी दारुचे दर आणण्यासाठी अबकारी करात किंवा एमआरपीच्या सूत्रात योग्य ते बदल करणे आवश्यक वाटते किंवा स्वस्त दराच्या दारुची निर्मिती करण्याबाबत विचार करण्यात यावा. | १. राज्य उत्पादन शुल्क विभाग, मंत्रालय मुंबई<br>२. आयुक्त, राउशु |
| ७.२.१४ | भविष्यात दुर्देवाने अशी दूर्घटना घडू नयेत व अपघाताने घडल्यास, बाधीतांना झालेल्या मिथेनॉलच्या विषबाधेला उपचार म्हणून तात्काळ इथाईल अल्कोहोल सारखा ॲन्टीडोट प्राथमिक केंद्रात तसेच ॲम्ब्युलन्स मध्ये उपलब्ध ठेवणे आणि अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडल्यास बाधीतांवर Standard Operating Procedure तयार करणे व ते सर्व संबंधीत अधिकारी/ कर्मचारी / कार्यालयामार्फत | १. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई<br>२. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई<br>३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई |

| | | |
|---|---|---|
| | पोचविणे आवश्यक आहे. Standard Operating Procedure मध्ये अशी घटना घडल्यास बाधीतांना तात्काळ प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा इस्पितळात संबंधीत विषारी द्रव्याची मात्रा कमी करण्यासाठी कोणते औषधोपचार करावेत, रुग्णांच्या बाबतीत काय काळजी घ्यावी, अशा प्रकारच्या दूर्घटना भविष्यात घडल्यास बाधीत रुग्णांना किमान वैद्यकीय सुविधा मिळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात पायाभूत सुविधांची उभारणी करणे आवश्यक आहे. ॲन्टीडोटचा पुरेसा साठा संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रात असणे आवश्यक आहे. तसेच संबंधित बाधीतांना वैद्यकीय अधिकाऱ्याच्या पथकाद्वारे लक्ष ठेवून औषधोपचार व्यवस्थीत होत असल्याचे व यथास्थिती गंभीर रुग्णांस अधिक चांगल्या वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी संबंधीत अधिकाऱ्यांना अधिकार देणे आवश्यक राहील त्याचप्रमाणे सर्व संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्यांची प्रशिक्षण शिबीर आयोजित करुन अशा दूर्घटनेनंतर करावयाच्या कार्यवाहीबाबत सखोल प्रशिक्षण देवून सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना याबाबत सजग व जागृक ठेवणे आवश्यक आहे. | |
| ७.२.१५ | अवैध मद्य, मद्यार्क, ताडी-माडी इ व्यवसायात गुंतलेल्या समाजकंटकांना त्यांच्यावर गुन्हा नोंदविल्यानंतर गुन्हा सिध्द होईपर्यंत वेळ मिळतो तसेच, विद्यमान न्यायालयात बऱ्याच वेळा कायद्याच्या तरतुदी विचारात घेवून त्याच दिवशी जामीन मिळतो. त्यामुळे त्यांना कायद्याचा धाक राहत नाही. तसेच पुन्हा ते बेकायदेशीर कामात स्थानिक नेत्यांना हाताशी धरुन असे अवैध व्यवसाय वाढवतात असे घडू नये म्हणून व गुन्हेगारी ची संख्या कमी व्हावी म्हणून कायद्याचा धाक निर्माण होणे ही काळाची गरज आहे यासाठी; पोलीस विभागामार्फत मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या व्यतिरिक्त इतर कायद्यातील तरतुदींचा आधार घेवून संबंधितांना जामीन मिळणार | १. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.<br>२. आयुक्त,राउशु |

नाही अशी कारवाई पोलीस विभागामार्फत केली जाऊ शकते तशी कारवाई राउशु करु शकत नाही. याकरिता राउशु विभागाने नोंदविलेल्या प्रत्येक प्रथम खबरी अहवालाची प्रत तात्काळ पोलीस स्टेशनला दिल्यानंतर पोलीस विभाग स्वतंत्ररित्या संबंधित आरोपींवर इतर कायद्यातील तरतुदीप्रमाणे (एमपीडीए) गुन्हा नोंदवू शकेल अशी तरतूद करणे योग्य राहील. अवैध दारु / बनावट / गावठी मद्य, मद्यार्क, ताडी इ. गुन्हयात राउशु विभाग महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ मधील तरतुदीनुसार गुन्हे नोंदवित असतात. परंतु अशा गुन्ह्यांमध्ये विषारी द्रव्य जाणीवपूर्वक सामान्य जनतेस पिण्यासाठी उपलब्ध करुन देवू केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द भा दं वि १८६० मधील कलम ३२८ व इतर कलमांचा वापर करण्याचा अधिकार राउशु विभागास संबंधित गुन्हयापुरते प्रदान करण्यास हरकत नाही.

त्याचप्रमाणे अशा गुन्हामध्ये महागड्या / शासन मान्य मद्याच्या बाटल्या, लेबल्स, बुचे इत्यादींचा वापर करुन बनावट मद्य / अवैध मद्य विक्री केली जाते. वैधरित्या वाहतूक होणाऱ्या मद्यार्काच्या वाहतूकीदरम्यान संबंधित वाहनातून मद्य / मद्यार्काची परस्पर चोरी करुन त्यात यथास्थिती बनावट / अवैध मद्य / मद्यार्क मिश्रीत करुन विक्री केली जाते यासाठी स्वामीत्व हक्क कायदा व भा दं वि कायद्याच्या कलम ४६१,४६२ व ४६३ इ कलमांचा वापर करण्याचा अधिकार राउशु विभागास प्रदान करण्याची हरकत नाही.

वारंवार असे गुन्हेगारी करणाऱ्या किंवा अशा गुन्ह्यात गुंतलेल्या सराईत गुन्हेगारांवर वेळीच वचक बसण्यासाठी सीआरपीसी १९७३ मधील कलम ११० व मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ च्या कलम ९३ मधील तरतुदींचा वापर करण्यात यावा. तसेच पोलीस तसेच महसूल विभागाच्या इतर विभागाच्या अधिकाऱ्यांच्या

| | | |
|---|---|---|
| | सहाय्याने सराईत गुन्हेगारासंबंधात दोन् प्रतिष्ठीत व्यक्तीच्या हमीच्या आधारे चांगल्या वर्तणूकीबाबतच्या बंधपत्र घेण्याची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करणे. | |
| ७.२.१६ | अवैध / बनावट गावठी दारु मद्यार्क ताडी इ. गुन्हयांमध्ये सखोल व गुणात्मक तपास होवून संबंधीत आरोपींना शिक्षा होईल इतके भक्कम पुरावे गोळा करण्यासाठी पोलीस विभागाप्रमाणे राऊशु विभागासही मोबाईल तसेच, इतर दूरध्वनी संपर्क साधनाचे, कॉल डिटेल्स रेकॉडस् (CDR) तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष अधिकार राउशु अधिकाऱ्यांच्या आयुक्त राउशु किंवा संचालक, (अंमलबजावणी दक्षता) राउशु यांना प्रदान करणे आवश्यक आहे. | १. राज्य उत्पादन शुल्क विभाग,मंत्रालय मुंबई<br>२. आयुक्त,राउशु<br>३. गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ७.२.१७ | मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ मधील तरतूदीनुसार अवैध / गावठी मद्य निर्मिती, बाळगणूक, खरेदी विक्री व वाहतूक या अपराधाकरिता शिक्षेच्या तरतूदी आहेत परंतू, त्या पुरेशा नाहीत. त्यामुळे, मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ मधील गंभीर गुन्हयाकरिता सश्रम कारावासासह आर्थिक दंड तसेच पहिल्या व दुसऱ्या अपराधाकरिता जप्त मुद्देमामालाच्या पटीत संदर्भासह दंडाची तरतूद (Dynamic Provision ) करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ मधील कलम १०८ अंतर्गत विधिग्राहय अनुज्ञप्तीधारकास त्याच्याकडे उत्पादन शुल्क चुकविलेला मद्यसाठा आढळून आल्यास संबंधिताकडून पहिल्या गुन्हयासाठी मुद्देमालाच्या तीनपट, दुसऱ्या गुन्ह्यांसाठी ४ पट व तिसऱ्यां व त्यापुढील गुन्ह्यांमध्ये मुद्देमालाच्या ५ पट दंडाची तरतूद आहे. परंतु मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ मधील प्रकरण-७ मधील कलम ६५ ते १०४ मध्ये यथाशक्ती सश्रम कारावासासह किमान रु. ५०,०००/ किंवा जप्त मुद्देमालाच्या पहिल्या | १. राज्य उत्पादन शुल्क विभाग,मंत्रालय मुंबई<br>२. आयुक्त,राउशु |

| | | |
|---|---|---|
| | गुन्हयासाठी तीनपट, दुसऱ्या गुन्हयासाठी ४ पट व तिसऱ्या व चौथ्या गुन्हयासाठी ५ पट या पैकी अधिक असेल इतक्या दंडाची तरतूद करणे व ते न भरलयास सश्रम कारावासात वाढ करण्याची तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे. | |
| ७.२.१८ | सरकारी जमिनीवर चालणाऱ्या अवैध धंदयाबाबत संबंधित स्थानिक स्तरावरील शासकीय अधिकारी / कर्मचारी, पोलीस पाटील, ग्रामसेवक इत्यादींवर अशा अवैध धंद्याची माहिती संबंधित पोलीस स्टेशनला कळविणे बंधनकारक आहे. अशा धंदयावर नियमित कारवाईसाठी संबंधित आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधिक्षक, आयुक्त, यांचे स्तरारुन स्थानिक स्तरावरील विभागाचे संबंधीत अधिकारी यांना कारवाई करणेबाबत दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात यावेत. | १. महसुल व वन विभाग<br>२. राज्य उत्पादन शुल्क विभाग, मंत्रालय मुंबई<br>३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई.<br>४. आयुक्त, राउशु |
| ७.२.१९ | अशा स्वरुपाची घटना घडू नये यासाठी अवैध गावठी दारुबाबत जनजागृती करुन त्याच्या दुष्परीणामाची जाणीव करुन देण्यासाठी दृकश्राव्य माध्यम, सामाजिक संस्था, एनजीओ तसेच समाजकल्याण विभागामार्फत दारु सेवनाबाबतच्या दुष्परीणामाबाबत जनजागृती मोहिम सुरु ठेवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अवैध दारु धंदयाविरुध्द स्थानिक पातळीवरुल महिला संघटना, सस्वयंसेवी संघटना या दारुबंदी कार्यक्रमास प्रोत्साहन देवून या अवैध दारुधंद्याबाबत त्यांच्याकडून गोपनीयरित्या माहिती मिळवून त्यावर कठोर कार्यवाहीसाठी उपाययोजना करणे. | १. सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.<br>२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई.<br>३. आयुक्त, राउशु |
| ७.२.२० | पोलीस तसेच राउशु विभागाच्या अधिकाऱ्यांना अवैध धंद्याविरुद्ध सामान्य माणसास तक्रार नोंदविण्यासाठी सहज मार्ग उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यासाठी पोलीस विभागाप्रमाणे राउुश तसेच विभागीय उपायुक्त राउुश आणि आयुक्त राउशु यांचेस्तरावर २४ तास कार्यरत असणारे तक्रार निवारण कक्ष | १ पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई.<br>२. आयुक्त, राउशु |

| | | |
|---|---|---|
| | कायमस्वरुपी उभारुन अशा प्रकारच्या तक्रारींवर कारवाईचे निर्देश तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना पाठवून त्यांच्याकडून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देणे. | |
| ७.२.२१ | अवैध /गावठी दारु, बनावट मद्य मद्यार्क, ताडी इत्यादींवर नियंत्रण ठेवण्यसाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांचे, खबऱ्यांचे जाळे वाढविणे आवश्यक आहे. तथापि, राउशु विभागाकडे खबऱ्यामार्फत गोपनीय बातम्या देण्यासाठी त्यांचा वेळ व पैसा खर्च होत असल्याने, त्यांच्याकडून आर्थिक स्वरुपाची मागणी प्राप्त होते. परंतु, राउशु विभागाकडे गोपनीय निधीची तरतूद नसल्याने खबऱ्यांचे प्रमाण कमी दिसते यासाठी, राउशु विभागास खबऱ्यांसाठी पोलीस विभागाप्रमाणे गोपनीय फंडाची तरतूद तसेच संबंधित अवैध धंदयाची खबर काढण्यासाठी कसोशिने व जोखीम स्वीकारुन प्रयत्न करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी १ टक्का रक्कम तसेच सिक्रेटस् सर्व्हीस फंडची तरतूद करण्यात यावी. | १. राज्य उत्पादन शुल्क विभाग,मंत्रालय मुंबई<br>२. आयुक्त,राउशु |